## मुलाला उमेदवारी न मिळाल्याने गुलाबराव पाटील नाराज

**मुंबई**–जळगाव विधान परिषदेची जागा भाजपच्या वाट्याला गेल्याने आपल्या मुलाला आमदार करण्याचे शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांचे स्वप्न अधुरे राहिले असून, यावरून ते प्रचंड नाराज आहेत. या जागेसाठी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी वारंवार चर्चा करूनही भाजपने ही जागा न सोडल्याने पाटील यांच्या मनातील खदखद कायम आहे. आज पुन्हा एकदा त्यांनी आपल्या खास शैलीत, 'नसीब में होगा तो उचलकर आयेगा, नही होगा तो' अशी शेरोशायरी करत आपल्या मनातील या तीव्र भावनांना वाट मोकळी करून दिली आहे.गुलाबराव पाटील म्हणाले, अनेक लोक म्हणतात की तुम्हाला विधानपरिषदेसाठी तिकीट मिळाले नाही. मात्र मी एवढेच सांगतो, 'नसीब मे होगा तो उचलकर आयेगा और नसीब में नही होगा तो आकर चला जायेगा', अशी शायरी त्यांनी म्हणून दाखवली. तसेच पुढे म्हणाले की, देवाच्या मनात यापेक्षाही पुढे आयुष्यात काही चांगले होणार असेल. त्यामुळे प्रारब्धावर विश्वास ठेवा. सगळं करा, राजकारण जरूर करा, पण भगवा प्रकाशातील विचार कधी सोडू नका. तुम्ही आमदार केले, मंत्री केले म्हणून मी सामाजिक कार्य करतो आहे. तुमची सेवा करू शकतो आहे, असेही पाटील यांनी म्हटले आहे.

# दैनिक निळे प्रतिक

## नवी मुंबईत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आंदोलन

**मुंबई**–नवी मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून वाढत्या महागाईच्या विरोधात आक्रमक पद्धतीने आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनाच्या वेळी पक्षातील प्रमुख नेते रोहित पवार, जितेंद्र आव्हाड तसेच शशिकांत शिंदे यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याचसोबत महिला पोलिसांनी रोहिणी खडसे तसेच सक्षणा सलगर यांनाही ताब्यात घेतले आहे. या आंदोलनावेळी एका आंदोलक महिलेची प्रकृती खालवल्याचे पाहायला मिळाले.या आंदोलनाच्यावेळी कार्यकर्त्यांनी भररस्त्यात खाली बसून, रस्त्यावरच चूल पेटवून भाकरी थापली. यावेळी रोहित पवार या महिला कार्यकर्त्यांसोबत होते. प्रसारमाध्यमांशी बोलताना रोहित पवार म्हणाले, महागाई मोठ्या प्रमाणात वाढत चाललेली आहे, लोकांचं जीवन अवघड होत चाललं आहे. पेट्रोलचे, डिझेलचे भाव वाढलेत. घरगुती गॅस महागला, कमर्शिअल गॅसचेही दर वाढलेत ना.यामुळे सामान्य व्यक्ती, मिडल क्लास चांगलाच अडचणीत सापडला आहे. त्यांच्यावतीने, त्यांचा आवाज बनून, सरकारपर्यंत त्यांचा आवाज जावा, झोपलेल्या सरकारला कुठेतरी जाग यावी या हेतूने आम्ही हे आंदोलन करत आहोत.

• छत्रपती संभाजीनगर • वर्ष : २ रे • अंक : २५२ • गुरुवार दि.४ जून २०२६ • किंमत ५.०० रू • पाने : ०४ • nilepratik02@gmail.com • दैनिक

# कमी भावात कांदा खरेदी करून साठेबाजी सुरु निधी मिळत नसेल तर महायुतीतून बाहेर पडा

## काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारांचा अब्दुल सत्तारांना थेट सल्ला

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**नागपूर । प्रतिनिधी**

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी विविध मुद्द्यांवरून महायुती सरकारला धारेवर धरले असून, शिवसेना नेते अब्दुल सत्तार यांना थेट सल्ला दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आंतरराष्ट्रीय कृषी करार शेतकऱ्यांना खड्ड्यात घालणारे असून, सध्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांची लूट करून कमी भावात कांदा खरेदी करत साठेबाजी सुरू आहे, असा गंभीर आरोप वडेट्टीवारांनी केला. तसेच, महायुतीमधील अंतर्गत वादावर बोट ठेवत, जर स्थानिक पातळीवर निधी मिळत नसेल आणि कोंडी होत असेल तर अब्दुल सत्तारांनी महायुतीतून बाहेर पडावे; कारण जो भाजपसोबत जातो त्याला बुडवण्याचे काम भाजपकडून नेहमीच होते, असा टोला वडेट्टीवारांनी लगावला आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जो अनेक देशांसोबत कृषी करार केला आहे तोच शेतकऱ्यांना बुडवणारा आहे. या कराराची समीक्षा झाली पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना खड्ड्यात घालण्याचे काम केले आहे.तो करार रद्द होईपर्यंत शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारू शकत नाही, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे सुद्धा हेच हाल सुरू आहेत. शेतकऱ्यांचे हाल सुरू आहे, त्यांच्याकडून कमी भावात कांदा विकत घेत त्याचा साठा करण्यात आला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, अब्दुल सत्तारांना निधी दिला जात नसेल तर त्यांनी महायुतीसोबत राहू नये. जो भाजपसोबत गेला त्याला बुडवण्याचे काम भाजपकडून होते हे सांगण्याचा प्रयत्न जर त्यांच्याकडून होत असेल तर निर्णय काय घ्यायचा हे त्यांनी ठरवावे. या सरकारमध्ये अंतर्गत वाद सुरू आहे. एका पक्षाच्या हाती सत्ता असल्याने इतर पक्षांना त्याचा त्रास होत आहे, म्हणून ते वेदना मांडत आहेत.विजय वडेट्टीवार म्हणाले की, शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांचे कर्जमाफ झाल्यानंतर वरचे पैसे भरण्यासाठी त्यांच्याकडे पैसे आहेत कुठे? जुने कर्ज असल्याने त्यांना नवे लोन सुद्धा मिळालेले नाही. दोन लाखाच्या आतील शेतकऱ्यांनी पैसे न भरल्याने यावर्षीचा हंगाम अडचणीत आला, निर्णय आज झाला तरी पैसे खात्यात का पडतील. त्याला किती कालावधी लागेल. खरीप हंगामानंतर पैसे मिळाले तर ते पीकच घेऊ शकणार नाही. कारण त्यांच्याकडे पैसेच नाही. कर्जमाफी हा केवळ दिखावा आहे, याचा शेतकऱ्यांना थेट काहीही फायदा नाही.प्रोत्साहन निधी आम्ही घेतलेला निर्णय आहे. त्या निर्णयावर हे सरकार ४ वर्षाने अंमजबजावणी करत आहे, यातून त्यांच्या शेतकऱ्यांबद्दल काय भावना आहेत या समजतात.विजय वडेट्टीवार म्हणाले की, चंद्रपूर जिल्ह्यातील दारू बंदी मी उठवली. जगात आणि देशात दारु सुरू आहे.ज्या राज्यांनी दारू बंदी केली त्या राज्यांनी पुन्हा दारू सुरू केली आहे. पुण्यात बनावट दारु पिल्याने अनेक जणांचा जीव गेला, तो आकडा दाबला जात आहे. गडचिरोलीत आदिवासी लोकांना मोहाच्या फुलांचा अर्क काढून पिण्याचा अधिकार आहे. इतरांसाठी तिथे दारू बंदी आहे. गडचिरोलीमध्ये औद्यौगिक वसाहत वाढत आहे. दारू बंदीमुळे काय लोकं व्यसनमुक्त होतो का? सर्व प्रगत देशात लिकर मिळते त्यामुळे धर्मराजबाबा आत्राम यांच्या गडचिरोलीतील दारू बंदी हटवली पाहिजे या मागणीला माझे समर्थन आहे.






# सेवानिवृत्ती म्हणजे शेवट नव्हे,नव्या आयुष्याचा आरंभ-इंजि.राजधर दांडगे यांचे प्रतिपादन

## जलसंधारण विभागातील कर्तव्यनिष्ठ अधिकारी राजधर दांडगे यांचा सेवापुर्ती सोहळा उत्साहात संपन्न

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

उपविभागीय जलसंधारण अधिकारी म्हणून प्रदीर्घ आणि यशस्वी सेवा बजावल्यानंतर नियत वयोमानानुसार ३१ मे रोजी सेवानिवृत्त झालेल्या इंजि. राजधर दांडगे यांच्या सेवापूर्ती सत्कार सोहळ्यात भावनिक आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. २ जून रोजी सिडको येथील हॉटेल फर्न येथे आयोजित करण्यात आलेल्या या भव्य कार्यक्रमात दांडगे यांना मित्रपरिवार, सहकारी, नातेवाईक आणि कुटुंबीयांच्या उपस्थितीत भावपूर्ण निरोप देण्यात आला.यावेळी आपल्या मनोगतात इंजि. दांडगे म्हणाले, आज या मंचावर उभे राहताना मनात अनेक भावना दाटून येत आहेत. आनंद, समाधान आणि कृतज्ञता यांच्यासोबतच नव्या आयुष्याची उत्सुकताही आहे. माझी कारकीर्द ही केवळ नोकरी नव्हती, तर अनुभव, शहाणपण आणि माणसे जोडण्याची एक समृद्ध शाळा होती. सुरुवातीच्या संघर्षाच्या काळात गुरुजन, वरिष्ठ सहकारी, मित्र आणि कुटुंबीयांनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच हा प्रवास यशस्वी झाला.

ते पुढे म्हणाले की, सेवाकाळात अनेकदा कर्तव्याला प्राधान्य देताना कुटुंबासाठी वेळ देता आला नाही. मात्र पत्नी, मुले आणि आई-वडिलांनी सदैव खंबीर साथ दिली. त्यांच्या त्याग आणि सहकार्यामुळेच आपण कर्तव्यनिष्ठेने सेवा बजावू शकलो. आज मागे वळून पाहताना वाटते की, ही नोकरी फक्त नोकरी नव्हती, तर माणसे कमावण्याची आणि नाती जपण्याची एक अमूल्य संधी होती.सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याविषयी बोलताना त्यांनी समाजसेवा, वाचन, लेखन, पर्यटन आणि आरोग्य संवर्धन यावर अधिक भर देणार असल्याचे सांगितले. नातवंडांसोबत वेळ घालवत पुन्हा एकदा बालपण अनुभवायचे आहे. नोकरीच्या व्यापामुळे राहून गेलेल्या अनेक गोष्टी पूर्ण करायच्या आहेत. ही सेवानिवृत्ती म्हणजे शेवट नसून नव्या पर्वाची सुरुवात आहे, असेही त्यांनी नमूद केले.






**इंजि.राजधर दांडगे संघर्षातून घडलेले व्यक्तिमत्व : प्रा. सचिन कंधारकर**

संघर्ष हा यशाचा पाया असतो आणि प्रामाणिकपणा हे यश टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य असते,

राजधर दांडगे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभात बोलताना जावाई प्रा. सचिन कंधारकर यांनी सासरे दांडगे यांच्या बालपणापासून ते शासन सेवेतील यशस्वी कारकीर्दीपर्यंतचा प्रवास उपस्थितांसमोर उलगडला. अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत जन्मलेल्या दांगडे यांनी शिक्षणाच्या बळावर आयुष्याला नवी दिशा दिली. प्राथमिक शिक्षण गावात पूर्ण केल्यानंतर त्यांनी कठीण परिस्थितीत शिक्षण सुरू ठेवत एसएससी परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळविले.

पुढे सिव्हिल अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण करून महाराष्ट्र शासनाच्या सेवेत कनिष्ठ अभियंता म्हणून त्यांची निवड झाली. जायकवाडी येथे प्रारंभिक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी कोकण विभागात आठ वर्षे उल्लेखनीय सेवा बजावली. त्यानंतर आपल्या मातृभूमीत परतल्यानंतर विविध विकासकामे, जलसंधारण प्रकल्प, निधी व्यवस्थापन, अंदाजपत्रक निर्मिती आणि गुणवत्तापूर्ण कामांच्या अंमलबजावणीत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

एखादे काम वेळेत, नियमबद्ध आणि अचूकपणे पूर्ण करायचे असेल तर ते राजधर दांडगे साहेबांकडे द्यावे, अशी भावना त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केल्याचे कंधारकर यांनी सांगितले. शासन सेवेत तब्बल ३६ वर्षे कार्यरत असताना दांडगे यांनी प्रामाणिकपणा, शिस्त आणि कर्तव्यनिष्ठा यांचा आदर्श कायम ठेवला. त्यांच्या कार्याची दखल वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच विविध स्तरांवरील नेतृत्वाने घेतल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी राजधर दांडगे यांच्या यशामागे त्यांच्या कुटुंबाचा असलेला मोलाचा वाटाही अधोरेखित केला. पत्नी, मुले आणि संपूर्ण परिवाराने दिलेल्या पाठबळामुळेच हा यशस्वी प्रवास शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

सेवानिवृत्ती म्हणजे आयुष्याचा शेवट नसून नव्या पर्वाची सुरुवात असल्याचे सांगत कंधारकर यांनी राजधर दांडगे यांना निरोगी, आनंदी आणि समृद्ध आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कर्तव्य हेच पूजन, प्रामाणिकपणा हाच धर्म आणि सेवा हाच जीवनमार्ग या तत्त्वांवर आयुष्यभर वाटचाल करणाऱ्या राजधर दांगडे यांना उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात मानवंदना दिली.कार्यक्रमास विविध विभागांतील अधिकारी, कर्मचारी, मित्रपरिवार, नातेवाईक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राजधर दांडगे यांची कन्या पारमिता कंधारकर यांनी देखील आपल्या वडिलांबद्दल भावना व्यक्त केल्या, त्या म्हणाल्या की, माझ्या वडिलांनी आम्हाला उच्च शिक्षण, संस्कार दिले. माझा विवाह झाल्यानंतर सुद्धा मला कधीच अंतर पडू दिले नाही. सदैव माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले, आमच्या आयुष्यात अनेक चढउतार आले, परंतु पप्पा कधीही डगमगले नाही, हे सांगत असताना त्या प्रचंड भावुक झाल्या होत्या. इंजि. राजधर दांडगे यांचे चिरंजीव इंजि. अंकुर दांडगे यांनी सुद्धा आपल्या वडिलांसाठी कवितेतून मनोगत व्यक्त केले, कवितेला सभागृहात उपस्थित मान्यवरानी भरभरून साथ दिली. या कार्यक्रमाप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे, नंदकिशोर भारशंकर, प्रभाकर पारधे, विष्णू दांडगे, सयाजीराव वाघ, नंदू चव्हाण, मनोज चव्हाण, यतीन कोठावळे, कल्याण हत्ते, राजू मिया देशमुख, कमलाकर पारधे, अब्दुल शेख, सुनील वाकेकर, रतनकुमार साळवे, यांनी मनोगत व्यक्त करून इंजि. राजधर दांडगे यांच्या कार्याचा गौरव केला व त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन कंधारकर यांनी केले, तर आभार अंकुर दांडगे यांनी मानले. उपस्थितांच्या शुभेच्छा, आठवणी आणि स्नेहभावनेच्या वातावरणात हा सेवापूर्ती सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.


# संपादकीय

## ६ जूनला तरुणांचा स्फोट की सोशल मीडियाचा फुटेल फुगा? देशवासीयांचे लागले जंतर-मंतरकडे लक्ष.!

भारतातील तरुणाई आज संतप्त आहे. बेरोजगारी, स्पर्धा परीक्षा, भरती प्रक्रिया आणि विशेषतः वारंवार समोर येणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांनी विद्यार्थ्यांच्या संयमाचा अंत पाहिला आहे. लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतात, घरची परिस्थिती हलाखीची असते, आई-वडील कर्ज काढून मुलांना शिकवतात, आणि परीक्षा आली की पेपर फुटल्याच्या बातम्या येतात. मग परीक्षा रद्द होतात, पुन्हा परीक्षा होतात, पुन्हा तयारी करावी लागते. या चक्रात अनेक तरुणांचे आयुष्य अक्षरशः भरडले जात आहे.अशा वेळी कॉकरोच पार्टीचे अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी या जखमेवर बोट ठेवले आहे. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनातील राग, असंतोष आणि व्यवस्थेविरोधातील आक्रोशाला शब्द दिले आहेत. त्यामुळेच अवघ्या काही दिवसांत सोशल मीडियावर लाखो-करोडो तरुण त्यांच्याशी जोडले गेले. हा केवळ एका व्यक्तीला मिळालेला पाठिंबा नाही; तर तो व्यवस्थेविरोधातील दडपलेल्या संतापाचा उद्रेक आहे.परंतु येथे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. सोशल मीडियावरील समर्थन आणि रस्त्यावरचे आंदोलन यात जमीन-अस्मानाचा फरक असतो. मोबाईलवर लाईक करणे, पोस्ट शेअर करणे आणि प्रत्यक्ष दिल्लीत जाऊन आंदोलनात सहभागी होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. भारतातील अनेक आंदोलनांचा इतिहास पाहिला तर सोशल मीडियावर प्रचंड गाजलेले अनेक विषय प्रत्यक्ष रस्त्यावर मात्र फसलेले दिसतात. त्यामुळे सहा जून रोजी जंतर-मंतरवर नेमके किती लोक जमा होतात, हा या आंदोलनाच्या यशाचा पहिला कस लागणार आहे.अभिजीत दिपके यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, मला पाहायचे आहे की सोशल मीडियावर पाठिंबा देणारे तरुण प्रत्यक्षात किती उभे राहतात. हा प्रश्न केवळ त्यांचा नाही; तर संपूर्ण देशाला पडलेला आहे. कारण भारतात पहिल्यांदाच एक आंदोलन सोशल मीडिया आणि डिजिटल संघटनशक्तीच्या जोरावर इतक्या वेगाने उभे राहताना दिसत आहे.दुसरीकडे, सरकारविषयी असलेला अविश्वास देखील या आंदोलनाला इंधन पुरवत आहे. विरोधी विचार मांडणाऱ्यांवर कारवाई होते, चौकशा होतात, अटक केली जाते, अशी भावना समाजातील एका मोठ्या वर्गामध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे अभिजीत दिपके यांना अटक होईल का, आंदोलनाला परवानगी मिळेल का, आंदोलन दडपले जाईल का, अशा चर्चा आधीच सुरू झाल्या आहेत.मात्र लोकशाहीमध्ये आंदोलन करणे हा घटनात्मक अधिकार आहे. जर कोणतीही व्यक्ती किंवा संघटना कायद्याचे पालन करून, परवानगी घेऊन, शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करत असेल तर त्या आंदोलनाला ऐकून घेणे ही सत्ताधाऱ्यांची जबाबदारी असते. आंदोलनकर्त्यांचे म्हणणे पटो अथवा न पटो, लोकशाहीची ताकद संवादात असते; दडपशाहीत नाही.आज विद्यार्थ्यांचा प्रश्न केवळ पेपरफुटीचा राहिलेला नाही. तो व्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न बनला आहे. लाखो तरुणांच्या मनात एकच प्रश्न आहे - अभ्यास आम्ही करायचा, कष्ट आम्ही करायचे, वर्षानुवर्षे तयारी आम्ही करायची आणि शेवटी भ्रष्टाचारामुळे आमचे भविष्य उद्ध्वस्त व्हायचे का? या प्रश्नाचे उत्तर सरकारकडे असलेच पाहिजे.या संपूर्ण प्रकरणात आणखी एक बाब लक्षवेधी आहे. देशातील अनेक राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि विद्यार्थी संघटनांनी या विषयावर आवाज उठवला. पण तो आवाज विखुरलेला राहिला. त्यात सातत्य दिसले नाही. याउलट अभिजीत दिपके यांनी थेट विद्यार्थ्यांच्या भावनांशी संवाद साधला. त्यामुळे त्यांना मिळणारा प्रतिसाद वाढत गेला.सोनम वांगचुक, विश्वंभर चौधरी, अंजली दमानिया यांसारख्या व्यक्ती आंदोलनात सहभागी होणार असल्याच्या चर्चा होत आहेत. जर हे खरे ठरले, तर आंदोलनाला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त होऊ शकते. मात्र कोणत्याही आंदोलनाचे यश हे मोठ्या नावांवर नव्हे तर जनसामान्यांच्या सहभागावर ठरत असते.सहा जून रोजी दिल्लीतील जंतर-मंतरवर काय घडेल, हे आज कोणीही निश्चित सांगू शकत नाही. आंदोलनाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळेल की अपेक्षाभंग होईल? सरकार संवादाचा मार्ग स्वीकारेल की संघर्षाचा? विद्यार्थ्यांचा संताप संघटित शक्तीत परिवर्तित होईल की पुन्हा एकदा सोशल मीडियापुरताच मर्यादित राहील? हे सर्व प्रश्न अनुत्तरित आहेत.पण एक गोष्ट निश्चित आहे. या आंदोलनाने देशातील तरुणांच्या मनात दडलेल्या वेदनेला राष्ट्रीय चर्चेचा विषय बनवले आहे. हीच त्याची पहिली आणि मोठी उपलब्धी आहे.आता नजर आहे ती सहा जूनकडे. कारण हा दिवस केवळ एका आंदोलनाचा नाही, तर भारतातील तरुणाईच्या मनातील विश्वास, संताप आणि संघर्षशक्तीची खरी परीक्षा ठरणार आहे. जंतर-मंतरवर किती गर्दी जमते यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न हा आहे की सत्ताधारी व्यवस्था त्या गर्दीमागील वेदना ऐकते का?सहा जूनला दिल्लीत फक्त आंदोलन होणार नाही; तर देशातील विद्यार्थ्यांच्या भविष्याविषयीचा एक मोठा जनमताचा कौल उमटणार आहे. आणि त्या कौलाकडे आज संपूर्ण देशाचे डोळे लागले आहेत.

# आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्र मानवाच्या वैज्ञानिक प्रगतीचे प्रतीक

मानवाने पृथ्वीच्या सीमारेषा ओलांडून अंतराळात केलेल्या सर्वात महान कामगिरींपैकी एक म्हणजे आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्र (International Space Station - ISS) होय. पृथ्वीपासून सुमारे ४०० किलोमीटर उंचीवर भ्रमण करणारे हे जगातील सर्वात मोठे आणि अत्याधुनिक अंतराळ संशोधन केंद्र असून विज्ञान,तंत्रज्ञान आणि जागतिक सहकार्याचे अद्वितीय उदाहरण मानले जाते.आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्राच्या निर्मितीची सुरुवात १९९८ मध्ये झाली.रशियाने 'झार्या' हे पहिले मॉड्यूल अंतराळात प्रक्षेपित केले आणि त्यानंतर अमेरिका,युरोप,जपान व कॅनडा यांच्या सहकार्याने ही विशाल रचना उभारण्यात आली.२ नोव्हेंबर २००० पासून येथे मानवाचे अखंड वास्तव्य सुरू असून गेली पंचवीसहून अधिक वर्षे हे केंद्र सातत्याने कार्यरत आहे.अमेरिका,रशिया,युरोपियन स्पेस एजन्सी,जपान आणि कॅनडा या देशांच्या अवकाश संस्थांनी संयुक्तपणे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकारला आहे.त्यामुळे आयएसएस हे केवळ वैज्ञानिक संशोधन केंद्र नसून जागतिक ऐक्य आणि सहकार्याचेही प्रतीक बनले आहे.सुमारे ४२० टन वजनाचे हे केंद्र पृथ्वीभोवती ताशी जवळपास २८,००० किलोमीटर वेगाने फिरते.पृथ्वीची एक प्रदक्षिणा ते अवघ्या ९० मिनिटांत पूर्ण करते.त्यामुळे तेथील अंतराळवीरांना एका दिवसात



सुमारे १६ सूर्योदय आणि १६ सूर्यास्त पाहण्याची संधी मिळते.एका वेळी सहा ते सात अंतराळवीर येथे वास्तव्यास राहू शकतात.आयएसएस हे एक अत्याधुनिक प्रयोगशाळा केंद्र आहे.येथे वैद्यकीय संशोधन, कर्करोग व स्टेम सेल अभ्यास, वनस्पतींची वाढ,सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाचा मानवी शरीरावर होणारा परिणाम, पदार्थ विज्ञान,भौतिकशास्त्र तसेच पृथ्वीचे हवामान निरीक्षण यांसारख्या क्षेत्रांत हजारो प्रयोग करण्यात आले आहेत. भविष्यातील चंद्र आणि मंगळ मोहिमांसाठी आवश्यक तांत्रिक व मानवी तयारीही येथे केली जाते.या संशोधनांचा फायदा पृथ्वीवरील आरोग्य, औषधनिर्मिती आणि तंत्रज्ञान क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर होत आहे.आयएसएस मधील 'कपोला' (Cupola) हा विशेष काचेच्या खिडक्यांचा विभाग अंतराळवीरांसाठी सर्वाधिक आकर्षणाचा विषय आहे. येथून दिसणारे पृथ्वीचे विहंगम आणि मनमोहक दृश्य मानवाच्या कल्पनाशक्तीलाही थक्क करून टाकते.

अंतराळवीरांचा दिवस अत्यंत शिस्तबद्ध असतो.वैज्ञानिक प्रयोग, उपकरणांची देखभाल, पृथ्वीशी संवाद,स्पेसवॉक आणि नियमित व्यायाम या गोष्टी त्यांच्या दिनक्रमाचा भाग असतात.सूक्ष्म गुरुत्वाकर्षणामुळे शरीरावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी त्यांना दररोज सुमारे दोन तास व्यायाम करावा लागतो.सध्या आयएसएस २०३० पर्यंत कार्यरत ठेवण्याची योजना आहे.त्यानंतर नियंत्रित पद्धतीने त्याचे विसर्जन करण्याचा विचार सुरू असून भविष्यात त्याच्या जागी आधुनिक व्यावसायिक अंतराळ केंद्रे उभारली जाणार आहेत.आजपर्यंत २८० हून अधिक अंतराळवीरांनी आयएसएसला भेट दिली आहे.उघड्या डोळ्यांनी चमकत्या ताऱ्यासारखे दिसणारे हे केंद्र मानवाच्या अथक जिज्ञासेचे, विज्ञाननिष्ठ विचारांचे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या सामर्थ्याचे जिवंत प्रतीक आहे. खऱ्या अर्थाने, सीमा पृथ्वीवर असतात,अंतराळात संपूर्ण मानवजात एकच असते. हा संदेश आयएसएस संपूर्ण जगाला देत आहे.

**-उज्वलकुमार म्हस्के.**
**छत्रपती संभाजीनगर.**
**भ्रमणध्वनी-९२८४५३०४९२.**

# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेत राजकुमार बडोले यांची नियुक्ती

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**नागपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू), नागपूरच्या कार्यकारी परिषदेच्या सदस्यपदी माजी मंत्री तथा ज्येष्ठ समाजनेते राजकुमार बडोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन व प्रशासकीय कार्याला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.विद्यापीठाच्या सर्वोच्च निर्णयप्रक्रियेतील महत्त्वाची यंत्रणा म्हणून कार्यकारी परिषद ओळखली जाते. विद्यापीठातील शिक्षण व्यवस्था बळकट करणे, संशोधनाला चालना देणे, विस्तार शिक्षणाच्या माध्यमातून शेतकरी व पशुपालकांपर्यंत आधुनिक ज्ञान पोहोचविणे, अभ्यासक्रमांचे अद्ययावतीकरण, पायाभूत सुविधांचा विकास तसेच पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यविज्ञानाशी संबंधित विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यकारी परिषद महत्त्वाची भूमिका बजावते.

राजकुमार बडोले यांना सार्वजनिक जीवनातील प्रदीर्घ अनुभव असून सामाजिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा लाभ विद्यापीठाला होणार आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, असा विश्वास विविध स्तरांतून



व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, त्यांच्या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत करत अभिनंदन केले आहे. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार , राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल, सुनील तटकरे यांच्यासह नियुक्त आमदार डॉ परिणय फुके, चैनसुख संचेती आणि संजय मेश्राम यांनी राजकुमार बडोले यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या अनुभवाचा आणि नेतृत्वाचा लाभ विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन व विकासात्मक उपक्रमांना होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

# तुकाराम मुंढे यांच्या निर्देशावरून परभणीत अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

## नियमबाह्य अन्नसाठा जप्त; ३.४७ लाखांचा मुद्देमाल ताब्यात

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**परभणी । प्रतिनिधी**

दि.३ नागरिकांना सुरक्षित व भेसळमुक्त अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने धडक मोहीम सुरू केली असून या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यांत दोन ठिकाणी कारवाई करून लेबल दोष असलेले बेकरी पदार्थ व खुले खादयतेल यांचा एकूण रुपये ३ लाख ४७ हजार ४४० किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. दि. ३० मे २०२६ रोजी अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी यांनी परभणी येथील वसमत रोडवरील मे. किसान फूड्स या बेकरीची आकस्मिक तपासणी केली. या बेकरीमध्ये उत्पादित टोस्टच्या पाकीटांवर अन्न सुरक्षा व मानदे कायदा-२००६ नुसार आवश्यक लेबलशिवाय विक्री व अस्वच्छ परिस्थितीत उत्पादन केल्यामुळे चेरी टोस्ट आणि तीळ टोस्ट या अन्नपदार्थांचा एकूण रुपये २८ हजार ८० किमतीचा २८६ किलोग्रॅम वजनाचा साठा जप्त करण्यात आला. तर दि. २ जून २०२६ रोजी परभणी येथील कच्ची बाजार येथील मे. मनियार ट्रेडर्स या पेढीची तपासणी करण्यात आली. या ठिकाणी खुल्या स्वरूपात विक्री करण्यात येणारे सोयाबीन तेल आणि पाम तेलाचा रुपये ३ लाख १९ हजार ३६० किमतीचा १ हजार ९९६ किलोग्रॅम वजनाचा साठा जप्त करण्यात आला. सदर दोन्ही ठिकाणच्या जप्त साठ्यातून नमुने घेऊन विश्लेषणाकरिता पाठविण्यात आले असून विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कायदेशीर कारवाई घेण्यात येणार आहे.

ही कारवाई परभणी येथील अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त (अन्न) श्री. अ. ए. चौधरी आणि छत्रपती संभाजीनगर येथील अन्न व औषध प्रशासनाचे सहा आयुक्त (अन्न) श्री. एस. आर. करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी वैभव ठोंबरे, कृष्णा मुळे आणि तुषार घोपे यांच्या पथकाने केली.

दरम्यान,अन्न व औषध प्रशासनाच्या परभणी कार्यालयातर्फे उन्हाळी मोहिमेअंतर्गत जिल्ह्यांत इतर अन्न पदार्थांसोबतच आंब्याचे चार, बर्फाचे दोन आणि आइसक्रीम फ्रोजन डेझर्ट यांचे ४ नमुने घेण्यात येऊन विश्लेषणाकरिता पाठविण्यात आले आहेत. अन्न व औषध प्रशासनाची भेसळखोर, नियमबाह्य अन्नपदार्थ उत्पादक व विक्रेते तसेच प्रतिबंधित अन्नपदार्थ विक्रेते यांच्या विरोधात मोहीम यापुढेही नियमित सुरूच राहणार आहे, असे सहायक आयुक्त श्री. चौधरी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.



# अल्पसंख्यांक संरक्षण कायदा लागू करा; मागणी विधान सभेत मांडण्याचे आमदार संदीप क्षीरसागर यांना निवेदन

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**बीड । प्रतिनिधी**

अल्पसंख्यांक समाजाच्या संरक्षणासाठी स्वतंत्र अल्पसंख्यांक संरक्षण कायदा लागू करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी अल्पसंख्यांक संरक्षण संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या निवेदनाद्वारे अल्पसंख्यांक संरक्षण कायद्याची मागणी आगामी विधानसभेत प्रभावीपणे मांडावी, अशी विनंती करण्यात आली.

शिष्टमंडळाशी संवाद साधताना आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले की, मी नेहमी सर्व समाजघटकांच्या पाठीशी उभा राहिलो असून यापुढेही राहणार आहे. अल्पसंख्यांकांच्या संरक्षणाचा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी सरकारने यासंदर्भात तातडीने कायदा करण्याची आवश्यकता आहे. हा विषय शासनाच्या पातळीवर पोहोचवून विधानसभेत मांडण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन.अल्पसंख्यांक समाजावर होणारे वाढते हल्ले, द्वेषपूर्ण वक्तव्ये, दंगली आणि मॉब लिंचिंगसारख्या घटनांच्या पार्श्वभूमीवर समाजाच्या हक्क व सुरक्षेसाठी स्वतंत्र संरक्षण कायदा करण्याची गरज असल्याचे शिष्टमंडळाने यावेळी अधोरेखित केले.यावेळी अल्पसंख्यांक संरक्षण संघर्ष समितीचे मुजतबा खान, प्रा. इलियास इनामदार, प्रा. शेख अमर, ॲड. जेबा शेख, शेख मुसा, ॲड. मोमीन अखिल, मुशीर इनामदार, शेख अखिल अण्णा, शेख मैनुद्दीन, पत्रकार पठाण अमरजान, सलीम खान, पाले खान, डॉ. मोसीन शेख, खदिरुज्जमा खान, शेख ऐहेतेशाम, सय्यद नबिलउज्जमा, ॲड. जावेद मणियार, अरफात खान,शामिर खान, आबेद कादरी, शेख खदीर, शेख नदीम, शाहनवाज खान, शेख मुशर्रफ, शेख जावेद,

शेख सलमान यांच्यासह अनेक सामाजिक व राजकीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक रतन नामदेव साळवे यांनी सोलापूर तरूण भारत मिडिया लि., प्लॉट नं. १/३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को. ऑप सोसायटी लि. एमआयडीसी, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र- ४३१००१) येथे छापून एफ-४/ १४, अयोध्या नगर, एन -७, सिडको छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र- ४३१००१) येथे प्रसिद्ध केले. * संपादक : रतन नामदेव साळवे, मो. ९९२३५०२३२०, E-nilepratik02@gmail.com

# मोलगी येथील परिसरात पावसाळ्यापूर्वी घराची सारवण व दुरुस्ती करतांना महिला

### असे तयार होते घर

सातपुड्याच्या ग्रामीण व दुर्गम भागातील घरे ही माती व लाकडापासून तयार होतात. अशा घरांचा वरती बांबूची चपटे असतात आणि त्यावर मातीचे कौल.घरांची भिंत तयार करण्यासाठी बांबूच्या चापट्या पासून बनविलेले तट्टे (कुड) वापरण्यात येतात,आता यासाठी कापसाच्या काड्यांचा वापर देखील करण्यात येत आहे. त्यावर माती, शेणाने सारवले जाते आणि मग आकर्षक असे घर तयार होते.



### मातीच्या घरांचे आकर्षण वाढले

सातपुड्याच्या परिसरात व पायथ्याशी असलेल्या विविध भागांमधील आदिवासी समुदायांची पारंपारिक घरे ही माती,शेण व कौलारू असतात आणि त्यांची रचना काँक्रीटच्या घरांपेक्षा चांगली असते. या मातीच्या घरात आरामदायक जीवन असते.शेणाने घराला सारवणे हे आरोग्यासाठी खूपच महत्त्वाचे असते आणि यामुळे अनेक रोगांपासून बचाव होतो असे आदिवासी जाणकार म्हणतात. त्यामुळे आता सर्वत्र मातीपासून तयार केलेल्या घरांचे आकर्षण वाढले आहे.

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**मोलगी । प्रतिनिधी**

अलीकडच्या काळात सिमेंटच्या घरांचे प्रमाण वाढले असले तरी सातपुड्याच्या ग्रामीण तसेच दुर्गम भागात मातीपासून तयार करण्यात आलेल्या कौलारू घरांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. पावसाळा जवळ आल्याने गेल्या काही दिवसांपासून अशा कौलारू घरांची डागडुजी करण्याचे काम अनेकांनी हाती घेतले आहे. त्यामुळे या भागात सर्वत्र कौलारू घरांची दुरुस्तीची लगबग सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.अलीकडे सिमेंटच्या घरांची क्रेज वाढल्याने अशा घरांचे प्रमाण वाढले असले तरी नंदुरबार जिल्ह्यातील विशेषतः सातपुड्याच्या ग्रामीण व दुर्गम भागात आजही कुडाची व शेण मातीने सारवलेली घरे मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. सातपुड्याच्या अतिदुर्गम भागात तर सर्वत्र माती पासून तयार केलेली झोपडी किंवा कौलारू घरचं नजरेस पडतात. पुढच्या महिन्यात पावसाळ्याला सुरुवात होणार आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी अशा घरांची दुरुस्ती करणे गरजेचे असल्याने, सध्या ग्रामीण भागात घरांची दुरुस्ती करतांना सर्वजण दिसून येत आहेत.

सातपुड्याच्या ग्रामीण किंवा अतिदुर्गम भागात जवळपास सर्वच घरे ही कौलारू व बांबू कुडाची शेण मातीने सारवलेली असतात.पावसाळा जवळ आल्याने अश्या अशा घरांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने, ग्रामीण भागात कौलारू घरांची दुरुस्ती करण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. मात्र कौलारू घरे दुरुस्त करण्याचा अनुभव खूप कमी लोकांना असल्याने, संबंधित लोकांची मनधरणी करताना घरमालकाच्या नाकीनऊ येत असल्याचे चित्र बघावयास मिळत आहे. त्यामुळे घर मालक स्वतः कुटुंबाचा मदतीने प्रसंगी नातेवाइकांच्या मदतीने घराची दुरुस्ती करीत असल्याचे दिसून येत आहे. दुरुस्ती दरम्यान गाळ-मातीसह जीर्ण लाकूड बदलून,छतावरील कौलांची दुरुस्ती करण्यात येत आहे. प्रसंगी घरावर नवीन कौल लावणे व मोडकळीस आलेले लाकडी फाटे नव्याने बसविणे आदी कामे करण्यात येत आहेत.

आदिवासी लोक ज्या भागात राहतात त्याठिकाणी पूर्वी खूपच मोठ्या प्रमाणात मातीचा घरं होती.पण आता ही मातीचे घरे कमी होत आहेत. त्यामुळे आदिवासी पारंपरिक भाव-भावना,मूल्ये, रीति-रिवाज, आचार,विचार आणि आरोग्यावर देखील याचा परिणाम होत असल्याचे चित्र आहे.या वर्षी उन्हाळा ४४ ते ४५ अंशा पर्यंत तापमान वाढल्याने लोकांना सिमेंटच्या घरातील उकाळ्यात राहणे कठीण होत असतांना ग्रामीण भगातील कौलारू आणि कुडाच्या घरातील राहाणारे लोकांना मात्र याची झळ बसत नाही.कौलारू आणि कुडाची घरे ही हवेशीर असतात.

–जोब्या वळवी
रहिवासी असली ता.धडगाव

# लोखंडी सळया चोरी करणाऱ्या चोरट्याला महिंद्रा पिकअपसह अटक; ११ लाखांचा मुद्देमाल जप्त

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**श्रीक्षेत्र राजुर । प्रतिनिधी**

हसनाबाद पोलीस ठाण्याच्या पथकाने मोठी कारवाई करत लोखंडी सळया चोरी करून वाहतूक करणाऱ्या एका चोरट्याला महिंद्रा पिकअप वाहनासह ताब्यात घेत तब्बल ११ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई ३१ मे २०२६ रोजी पहाटे करण्यात आली. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ३० मे २०२६ रोजी रात्री गस्त घालत असताना हसनाबाद फाटा परिसरात एक संशयित महिंद्रा कंपनीचे पिकअप वाहन आढळून आले. वाहन थांबवून चालकाकडे चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. वाहनातील मालाबाबत तसेच वाहनाच्या कागदपत्रांबाबत विचारणा केली असता तो उडवाउडवीची उत्तरे देत होता.यानंतर प्रभारी अधिकारी सपोनि योगेश डवळे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान चालक विजय बाबुराव पाखरे (वय ३६ वर्षे, रा. अंबड, ता. अंबड, जि. जालना) याच्याकडे वाहनातील लोखंडी सळ्यांची कोणतीही वैध कागदपत्रे नसल्याचे आढळून आले. तसेच सळ्या चोरीच्या असल्याचा संशय बळावल्याने पंचांसमक्ष वाहन व माल जप्त करण्यात आला.



जप्त मुद्देमाल
महिंद्रा कंपनीचे पिकअप वाहन – किंमत अंदाजे ७,५०,०००
अंदाजे ४ टन वजनाच्या लोखंडी सळया – किंमत अंदाजे ३,५०,०००
एकूण जप्त मुद्देमाल : ११,००,०००

या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम व इतर संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. प्राथमिक तपासात हा मुद्देमाल पो.स्टे. धाड (जि. बुलढाणा) हद्दीतून चोरीस गेलेला असल्याचे निष्पन्न झाले असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबिरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, नितीन कटेकर उपविभागीय पोलीस अधिकारी भोकरदन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत प्रभारी अधिकारी योगेश उबाळे तसेच सखाहरी तायडे मंगलसिंग सोळंके भरतकुमार चौधरी दुर्गेश राठोड दिपक सोनुने प्रकाश बोर्डे नारायण चरावंडे शंकर क्षिरसागर अनिल सवडे हसनाबाद पोलीस ठाण्याच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

हसनाबाद पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे चोरीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार असून परिसरात या कारवाईचे स्वागत करण्यात येत आहे.

# वाहन चालकानी वाहन सुरक्षित चालवावे

## अनेक ठिकाणी अपघाताच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत, आपली घरी कोणीतरी वाट पाहणार असतं याचा विचार करावा

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**

राज्यामध्ये सध्या सर्वत्र रस्त्याचे काम पूर्ण झाले असून अनेक वाहन चालक बेधुंद अवस्थेत, वेगाने वाहने चालवतात यामुळे अनेक अपघात होतात अपघात टाळण्याकरिता नियमाचे पालन करून वाहने सावकाश चालवावी, सेनगाव तालुक्यामध्ये एका महिन्यामध्ये अनेक अपघात झाले असून या अपघातामध्ये अनेक जणाचे मृत्यू झाले आहे, येलदरीच्या पुलावरून एक बोलेरो पिकपचा रात्री पूर्णा नदी पात्रात पडून एकाचा मृत्यू झाला त्यालाही घराची जबाबदारी व लहान लहान मुले होते, हिंगोली सेनगाव महामार्गावर मोटर सायकल व फोर व्हीलर चा अपघात झाला यामध्येही मृत्यू झालेल्या व्यक्तीला लहान लहान मुले होती घराचा प्रमुख असल्याने त्याचाही संसार उघड्यावर आला सेनगाव गोरेगाव महामार्गावर आजेगाव जवळ मोटरसायकल व फोर व्हीलर चा अपघात झाला मोटरसायकल स्वराचा जागीच मृत्यू झाला त्यालाही लहान लहान मुले होती, काल सेनगाव रिसोड महामार्गावर सेनगाव पासून दोन ते तीन किलोमीटर अंतरावर दोन शिक्षकाचा मृत्यू झाला त्यांनाही लहान लहान मुले होती, राज्यामध्ये सर्वत्र रस्त्याचे काम झाले असून अनेक वाहने हे वेगाने चालत आहे परंतु वेगाने चाललेल्या वाहनाचे नियंत्रण सुटून अनेक अपघात झाले आहेत आपली काळजी करणारं कोणीतरी घरी असते याची जाणीव न ठेवल्याने असे अपघात घडत आहेत आपली घरी कोणीतरी वाट बघतो याची काळजी मनामध्ये सतत ठेवून वाहने सावकाश चालून आपला प्रवास करावा जेणेकरून अपघात नियंत्रणात येतील आणि आपला प्रवास हा चांगल्या पद्धतीचा होईल सेनगाव तालुक्यामध्ये अनेक अपघात झाले या अपघातामध्ये अनेकांचे घर उघड्यावर आले मदतीला कोणीही येत नसतो सर्वकाही घरच्या व्यक्तींना सांभाळायचं असतं माणसाचा मृत्यू झाल्यानंतर सख्खा भाऊ ही व्यवस्थित राहत नसतो व घरच्या मुळाबालाचा सांभाळ करत नसतो याचीही काळजी घ्यायला पाहिजेत, जिवंत उदाहरण अनेक आहेत सख्का भाऊ कितीही जीव लावणारा असला तरीही एका वर्षाच्या पुढे सांभाळ होत नाही यामुळेच वाहन चालवताना आपल्या घरच्या मुलाबाळाचा पत्नीचा आई-वडिलांचा विचार करून शिस्तबद्ध वाहने चालवावी



आपला जीव अनमोल आहे जीवासोबत खेळायला पाहिजे नाही परंतु बेधुंद अवस्थेने वाहने चालवण्याने अनेक अपघात घडत असतात शासनाने दिलेल्या नियमाप्रमाणे वाहने सावकाश चालवून आपला प्रवास करावा आपली घरी कोणीतरी काळजी करणारे आहेत याचा सतत विचार करावा,

# लातूरच्या जागृती शुगर इंडस्ट्रीजला राज्य पातळीवरील सर्वोत्कृष्ट तांत्रिक संचालन व नवीनत्तम कार्याचा प्रथम पुरस्कार प्रदान

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**लातूर । प्रतिनिधी**

वेस्ट इंडियन शुगर मिल असोसिएशन (विस्मा) यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय सर्वोत्तम तांत्रिक संचालन व नविनत्तम कार्य Technical Operation and innovation) मानाचा पुरस्कार लातूर जिल्ह्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज या कंपनीला शनिवारी शानदार सोहळ्यात पुणे येथे भारताचे केंद्रीय रस्ते ,वाहतूक , परिवहन मंत्री नामदार नितीनजी गडकरी व राजस्थानचे राज्यपाल महामहीम हरिभाऊजी बागडे यांच्या शुभ हस्ते जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे संचालक दिलीप माने सरव्यवस्थापक गणेश येवले यांनी पुरस्कार स्वीकारला या अत्यंत मानाच्या पुरस्कारामुळे राज्य पातळीवरील साखर उद्योगात लातूरच्या जागृती शुगर इंडस्ट्रीजचे नाव कोरले आहे राज्याचे माजी मंत्री सहकार तथा जागृति शुगर चे संस्थापक दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जागृती शुगर इंडस्ट्रीजच्या अध्यक्षा व कार्यकारी संचालक गौरवी अतुलबाबा भोसले (देशमुख) यांच्या नेतृत्वाखाली गेली १६ वर्षापासून साखर कारखान्याची दैदिप्यमान वाटचाल सुरू आहे हे विशेष आहे .शनिवारी पुणे येथील वेस्ट इन हॉटेल कोरेगाव पार्क येथील भव्य दिव्य कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील राज्याचे माजी सहकार मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री नामदार शिवेंद्रसिंह राजे भोसले खासदार बजरंग सोनवणे साखर आयुक्त संजय कोलते ,बी बी ठोंबरे यांची उपस्थिती होती

**जागृती तशी प्रगती**

जागृती शुगर इंडस्ट्रीज मागच्या १६ वर्षाच्या गळीत हंगामात मोठ्या प्रमाणात उसाचे गाळप करत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपी पेक्षा अधिक भाव देत या भागात शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता देण्याचा प्रयत्न केला असून हे करीत असताना माजी मंत्री सहकार महर्षी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव देशमुख साहेब यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याने सूक्ष्म नियोजन करत पारदर्शकता ठेवून केवळ उस गाळप इतक्यावरच न राहता शुगर इंडस्ट्रीजने इथेनॉल, वीज, सी बी जी गॅस आदी विविध नवनवीन तंत्रज्ञान वापरून प्रकल्प हाती घेतले आहेत त्यामुळें शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अधिक उसाला योग्य भाव देण्यासाठी या साखर कारखान्याकडून मोठी मदत झाली असून राज्यात खाजगी साखर उद्योगात मराठवाडा आणि विदर्भ राज्यात कारखाना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अधिक भाव देण्यात आघाडीवर राहिलेला आहे .




# श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन मध्ये विद्यार्थी पालक मेळावा व गुणवंताचा गुणगौरव सोहळा सपन्न

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील नामांकित ग्रामीणभागात उच्च दर्जाचे संगणक प्रशिक्षण देणाऱ्या श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन या प्रशिक्षण केंद्रात एम एस सी आय टी (MS-CIT) चे प्रशिक्षण घेत असलेले विद्यार्थी व पालकांचा मेळावा व १० वी शालांत प्रमाणपत्र परिक्षेतील परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.याविषयी सविस्तर वृत्त असे की, तालुक्यातील चिंचोली माळी सारख्या ग्रामीण भागात एमकेसीएल चे अधिकृत अध्ययन केंद्र श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशनच्या माध्यमा तून व एमकेसीलचे जिल्हा समन्वयक श्री. विठ्ठल पांचाळ सर यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या संगणकीय कोर्सेसच्या माध्यमातून संगणकीय साक्षरता मोठ्या प्रमाणात राबविण्याचे काम संचालक अनिल गलांडे हे करीत आहेत.त्याचाच एक भाग म्हणून सध्या एम एस सी आय टी (MS-CIT) करीत असलेल्या विद्यार्थ्यांना सर्वसामान्य व्यवसायात तसेच छोट्या मोठ्या नोकरीस उपयुक्त क्लीक (Klic) Knowledge lit Carrier कोर्सेस ची जनजागृती होऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना याचा लाभ व्हावा म्हणून पालक मेळावा घेवून याविषयीं मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून सौ.रेश्मा गायकवाड या होत्या तर प्रमुख पाहुण्या म्हणून सौ.कोमल कापरे,सौ. प्रियंका शिंदे,सौ.वैष्णवी काळे,कु.सायली गायकवाड,श्री संस्कार एज्युकेशन ग्रुपचे अध्यक्ष अनिल गलांडे हे होते.यावेळी बोलताना सर्व अध्यक्ष व सर्व प्रमुख पाहुणे यांनी संगणकीय शिक्षणाचे महत्व विषद केले व १० वी शालांत प्रमाणपत्र परिक्षेतील संविधान शाहू तुपारे,रोहित महादेव गायकवाड,साक्षी संजय मेहरकर,स्वाती गोकुळ सारुक,फातेमा खाजा शेख,साक्षी दशरथ गव्हाणे या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुषपगुच्छ व सन्मानचिन्ह देवून यथोचित सन्मान करण्यात आला तर किशोर विक्रम हांगे, राधाराणी मधुकर निंगुळे,तुळशीदास अशोक काळे,वैष्णवी राजाभाऊ माने,अभिषेक बालाजी राऊत,आदित्य बालाजी राऊत,तनुजा जगन्नाथ वनवे,श्रेया संजय शिंदे,सोनम कादिर पठाण,नाजिया जिलानी तांबोळी, आरशिया मुस्तफा तांबोळी,विराट सूर्यकांत घोडके,आदर्श उत्तरेश्वर तुपारे,मानसी दिपक बजगुडे,पूजा बालासाहेब मावकर,अभिषेक दीपक भांगे,शिवम भास्कर बर्डे, विश्वदीप वैजनाथ शिंदे, रेहान ऐंनोद्दीन शेख, वैष्णवी आश्रुबा बजगुडे, अर्पिता आश्रुबा बजगुडे या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व पदक देऊन सन्मान करण्यात आला. व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन श्री संस्कार एज्युकेशन ग्रुप चे अध्यक्ष अनिल गलांडे यांनी केले तर या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी प्रशिक्षक अदित्य गलांडे,अमोल गलांडे, संचित गलांडे यांनी परिश्रम घेतले.या मेळाव्यात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिक उपस्थित होते.



# पंतप्रधानांच्या ‘इंधन बचाव’ संदेशाचा दिखावा महापालिकेच्या आवारात सायकली धूळ खात उभ्या

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत आणि पर्यावरण संरक्षणासाठी देशातील नागरिकांना ईंधन वाचवा असे आवाहन केले होते. या आवाहनानंतर देशभरातील अनेक लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांनी काही तासांसाठी किंवा एखाद्या दिवसापुरते सायकलवरून कार्यालयात जाऊन मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळवली. सोशल मीडियावर फोटो, वृत्तवाहिन्यांवरील बातम्या आणि वर्तमानपत्रांतील झळकलेल्या छायाचित्रांमुळे इंधन बचतीचा संदेश देण्याचा प्रयत्न झाल्याचे दाखविण्यात आले.

मात्र, प्रत्यक्षात या उपक्रमाचे काय झाले, याचे ज्वलंत उदाहरण छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत पाहायला मिळत आहे. महानगर पालिका चे विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद यांनी महापौर आणि उपमहापौर आणि स्थायी समिति सभापती यांना इंधन बचतीचा संदेश देण्यासाठी सायकली भेट दिल्या होत्या. या सायकलींचा वापर नियमितपणे होईल आणि पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती.

परंतु आज वास्तव चित्र वेगळेच आहे.



महानगर पालिका आवारात झाड़ाखाली कुलुप बंद तीन सायकाय उभे आहे. ( फोटो नजीमोद्दीन काजी )

महापालिकेच्या आवारात झाडाखाली तीन सायकली साखळीने कुलूपबंद अवस्थेत उभ्या आहेत. उन्हाचा तडाखा, धूळ आणि आता सुरू होणारा पावसाळा यामुळे या महागड्या सायकलींची मोठ्या प्रमाणात नासाडी होणार आहे. नियमित देखभाल आणि वापराअभावी काही दिवसांत या सायकली भंगारात जमा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यामुळे एक प्रश्न उपस्थित होत आहे की, पंतप्रधानांनी दिलेल्या ‘इंधन बचाव’ संदेशाला खरोखर कितपत गांभीर्याने घेतले गेले...? सायकल चालवून काढलेले फोटो आणि प्रसिद्धीसाठी केलेले उपक्रम हे केवळ प्रसारमाध्यमांपुरतेच मर्यादित होते का? पर्यावरण संरक्षण आणि इंधन बचतीसारख्या गंभीर विषयांचे केवळ राजकीय स्टंटमध्ये रूपांतर झाले का, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

जर लोकप्रतिनिधींनी स्वतःच अशा उपक्रमांकडे दुर्लक्ष केले, तर सामान्य नागरिकांनी पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करण्याची अपेक्षा कशी करावी? प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी याबाबत आत्मपरीक्षण करून प्रत्यक्ष कृतीतून उदाहरण घालून देण्याची गरज असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

# बुद्धभूमी येथील भिक्खू निवास व बुद्ध मूर्तीची तोडफोड प्रकरणी परभणीतून निषेध

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**परभणी | प्रतिनिधी**

कल्याण डोंबिवली महापालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उड्डाणपूल बांधण्यासाठी बुद्ध भुमी फाऊंडेशन बुद्ध विहार ला लागून, उड्डाणपूल बांधण्यासाठी घाट घातला आहे, कल्याण डोंबिवली मनपाच्या व पोलिस प्रशासनाने जोर जबरदस्तीने भंते निवास, बुद्ध मुर्ती यांची तोडफोड करून, भंते यांना धक्काबुक्की केली आहे, पोलिसांची ही दादागिरी असंविधानिक व कायद्याला काळिमा फासणारी आहे, या घटनेचा आज परभणीतील निषेध वक्त करून संबंधित ठेकेदार व पोलीस प्रशासनावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

बुद्धभूमी हे बौद्धांचे पवित्र धम्म संस्कार केंद्र आहे. येथे उड्डाणपूल बांधण्याचा घाट केवळ जातीय मसिकतेने होत आहे. प्रशासनाने पोलीस बळाचा वापर केला हे असंवैधानिक कृत्य आहे.



कल्याण डोंबिवली महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम एम आर डी ए) यांनी उड्डाणपूल बांधकामाच्या नावाखाली बुद्धभूमी फाऊंडेशन बुद्ध विहार परिसराला लक्ष्य केले आहे.असा आरोप निवेदनातून केला आहे. मनपा व पोलीस प्रशासनाने जोरजबरदस्ती करून भंते निवास व बुद्ध मूर्तीची तोडफोड केली असून, हा प्रक्रार असंविधानिक, बेकायदेशीर व मानवी हक्कांचे उल्लंघन करणारा आहे. संबंधित ठेकेदार व भिक्खू यांना धक्कामुक्की करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी.अशी मागणी परभणीतील धम्म मैत्री संवाद अभियान,भिख्खू संघ यांच्यावतीने करण्यात आली. या वेळी भदंत बुद्धकीर्ती महाथेरो, भदंत सुगत शांत्येय,संजय बगाटे राजकुमार येंगडे ड विनोद अंभोरे बौद्धचार्य एम एम बरे,गौतम पंडित मिलिंद पुंडगे आदींच्या स्वाक्षरी आहेत.

# सोशल मीडियातून आंबेडकरी विचारांचा प्रसार; कार्यकर्त्याचा प्रशस्तीपत्रक देऊन गौरव

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी**

सोशल मीडियाच्या माध्यमातून रिपब्लिकन सेनेची भूमिका सातत्याने, ठामपणे आणि प्रभावीपणे मांडत आंबेडकरी विचारधारेचा व्यापक प्रसार करणारे युवा आंबेडकरी कार्यकर्ते ॲड. अतुल कांबळे यांचा दादर येथील आंबेडकर भवन येथे प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर व मनिषाताई आंबेडकर यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.

ॲड. अतुल कांबळे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून रिपब्लिकन सेनेची भूमिका निर्भीडपणे आणि प्रभावीपणे मांडत आंबेडकरी चळवळीच्या विचारांना व्यापक समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण आणि अभ्यासपूर्ण मांडणीमुळे अनेक आंबेडकरी कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळत असून आंबेडकरी राजकीय




विचारधारा अधिक व्यापक होत असल्याची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. प्रशस्तीपत्रकात नमूद केल्यानुसार, जिद्द, चिकाटी आणि निष्ठेने केलेले त्यांचे कार्य चळवळीची ताकद वाढविणारे असून समाजपरिवर्तनाच्या लढ्यात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे, गौरवपूर्ण व सदैव प्रेरणादायी आहे.

यावेळी राजगृहाचे युवराज व रिपब्लिकन सेनेचे नेते ॲड. अमन आनंदराज आंबेडकर, रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय सचिव संजीव बौधनकर, महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी यांच्यासह रिपब्लिकन सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सन्मानाबद्दल ॲड. अतुल कांबळे यांनी आनंदराज आंबेडकर, मनिषाताई आंबेडकर तसेच ॲड. अमन आंबेडकर यांचे मनःपूर्वक आभार मानले. हा गौरव भविष्यातही आंबेडकरी चळवळीच्या विचारप्रसारासाठी अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा देणारा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# भिक्षुनीं धम्म प्रवचनात ज्वलंत प्रश्न मांडावेत- भन्तेश्रद्धारक्षित

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी**

साकेत नगर बुद्ध विहारांमध्ये ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त पूज्य भंते-श्रद्धारक्षित यांनी आज धम्म प्रवचन देत असताना पारंपारिक पद्धतीने पौर्णिमा साजरी करण्याऐवजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या पद्धतीने समाजाकडून कृतीची अपेक्षा केली आहे, ती होते की नाही हेसांगण्याचीजबाबदारी भिख्खू संघावर येऊन पडलेली आहेअसेसुरुवातीलाचसांगीतले. तद्वतच उपासक संघानेसुद्धा आपली जबाबदारी पार पाडण्याची नितांत गरज आज या क्रांती प्रतिक्रांती च्या पार्श्वभूमीवर येऊन ठेपली आहे असे सांगितले.

बौद्ध समाजातील आज जी प्रगती दिसते आहे, ती वरवरची प्रगती आहे. पाच दहा टक्के लोक गाडी बंगला घेतात, शंभर टक्के समाज श्रीमंत झाला हे बाहेरून जरी दिसत असलं तरी आजही या समाजात गरिबी आहे हे मान्य करायला पाहिजे.

पूज्य भंतेजी पुढे म्हणतात.आरक्षण मिळाले म्हणून नाही तर डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मदीक्षादेतअसतानाच सांगितले होते की मला बुद्ध धम्म यासाठी माझ्या समाजाला द्यायचा आहे की मला माझ्या समाजामध्ये स्वाभिमान जागृत करायचा आहे, म्हणूनच बाबासाहेब म्हणतात की शिका, संघटित व्हा व संघर्ष करा. पण फक्त शिकून चालणार



नाही, आता क्रांती करण्याचीही गरज नाही, तर समाजाकरता पुढील काळाकरता काय करता येईल याकरता उपासकाचे पाच- पाच, दहा- दहा जणांचे छोटे-छोटे संघ निर्माण होऊन, पुढील दहा वर्षाचे, पन्नास वर्षाचे प्लॅनिंग समाजाने करायला पाहिजे असे सांगितले.

पुढे आरक्षण संपेल त्यावेळेस मोठ्या अभ्यासक्रमासाठी आपल्याकडे कदाचित फीस नसेल. फीस नाही म्हणून शिक्षण नाही , अशीही परिस्थिती येऊ शकते.

म्हणून पुढे ते म्हणतात की आपल्या शिकल्या-सवरल्या लोकांनी आपला वेळ बाजूला ठेवून, येणाऱ्या पिढ्यांसाठी तालुका पातळीवर, शैक्षणिक संकुल उभे केले पाहिजेत. पतसंस्था निर्माण करायला पाहिजेत. जेणेकरून नोकऱ्या नाही लागल्या तर उद्योगधंद्यासाठी कर्ज देण्यासाठी अशा पतसंस्था बँकांची निर्मिती होणे गरजेचे आहे असे ते म्हणाले. (आताच आम्हाला डावलले जात आहे, याचा आम्ही विचारही करत नाही)

आम्ही शिकलो, श्रीमंत झालो पण पुढे काय, समाजाचं काय, येणाऱ्या पिढ्यांसाठी आम्ही काही करू शकतो का, याचा विचार करणे गरजेचे आहे.

पूज्य भंतेजी फक्त समाजाकडून अपेक्षा करून थांबले नाहीत तर ते सुद्धा म्हणतात की मी स्वतः जिथे जातो तिथे पारंपारिक पद्धतीने धम्म सांगत बसत नाही आता ती वेळही नाही आता आमच्या समाजाने कोणती कृती केली पाहिजे जी बाबासाहेबांनाअपेक्षित आहे, ते मी सांगण्याचे माझ्या धम्म प्रवचनातून काम करतो आहे असे ते म्हणाले.

स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की मला प्रशिक्षित भिख्खू पाहिजेत . असे भिक्खू जे आज तत्कालीन जी परिस्थिती आहे, प्रश्न आहेत,त्या परिस्थितीबद्दल, समाजाला ज्ञान देऊन,धम्मदेशना देऊन अवगत करतील, त्यांना आपल्या धम्मदेशनेतून जागृत करतील.आज समाजाला कशाची गरज आहे हे ओळखावे . यालाच बाबासाहेबांनाअपेक्षित धम्मप्रवचन म्हणता येईल, असे पूज्य भंतेजी म्हणतात.

याच्या पुष्ट्यार्थ पूज्य भंतेजी दाखला देतात की बुद्ध धम्म हा परिवर्तन वादी धम्म असून,परिस्थितीनुसार, मानवजातीच्या कल्याणासाठी,

सुखासाठी दुखमुक्ती साठी लवचिकता ठेवून आहे. तथागत बुद्ध धम्म हा बहुजन हिताय, बहुजन सुखाय यावर आधारित असून, ज्यामध्ये बहुजनाचे हित आहे तेच सांगण्याचे काम पूज्य भिख्खू संघावर आहे.

पौर्णिमेच्या कार्यक्रमाची सांगता करत असताना पूज्य भंतेजी, भिक्खू संघाने स्वतःच्या धम्म प्रवचनाचा विषय आजच्या परिस्थितीला अनुरूप असा निवडावा, तसेच उपासक संघाने सुद्धा, येणाऱ्या पुढच्या पिढ्यांसाठी आम्हाला काय करावे लागतील यासाठी एकत्र बसावे लागेल.

आजच्या या पौर्णिमे निमित्त साकेत बुद्धविहार समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष माननीय राहुल मेश्राम या परिवाराने उपासकांना खीरदान दिले शेवटी धम्मपालन गाथेने कार्यक्रम संपन्न झाला.

# पालि आम्ही सारे तिचे वाली प्रा.डॉ.एस.एम.सोनोने

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी**

२८ वाशिम, पालि आम्ही सारे तिचे वाली. असे प्रतिपादन लातूरचे प्राध्यापक डॉक्टर सोनोने यांनी मोहजा रोड वाशिम येथे पालि भाषा प्रशिक्षण केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी केले. पुढे बोलताना डॉक्टर सोनवणे म्हणाले की,

भगवान बुद्धाच्या काळात पालिही संपूर्ण भारतीयांची बोली भाषा होती. सर्व लोक पालिमध्येच बोलत होते. परंतु आता पालि तिला नाही कोणी वाली असं म्हणण्याची वेळ आली. यावर मात करण्यासाठी आम्ही महाराष्ट्रामध्ये दहा पालि भाषा प्रशिक्षण केंद्र स्थापन करत आहोत त्यापैकी आज मोहजा



रोड वाशिम येथे पाचव्या केंद्राची स्थापना करत आहोत. आता आम्ही पालि भाषा शिकून पालितच बोलू आपला परिवार गाव व शहर पालिमय करू आणि पूर्वीची म्हण बदलून टाकू आता पालि आम्ही सारे तिचे वाली. असं कृतीमध्ये आणू. या उद्घाटनाच्या कार्यक्रमामध्येच सोनोने सरांनी पालि भाषा शिकवली आणि अल्पावधीतच सर्व लोकांनी पालि भाषेतच आप-आपला परिचय दिला. भन्ते प्रज्ञापाल महाथेरो यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. भन्ते उपाली यांनी प्रास्ताविक केले. महेंद्र हिवराळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले. या कार्यक्रमास लहान - थोर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १७ जून रोजी परभणीत आरक्षण उपवर्गीकरण विरोधी धडक महामोर्चा

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**परभणी | प्रतिनिधी**

आरक्षण उपवर्गीकरकणा आड आरक्षणच संपवून अनु जाती समूहातील फूट पडण्याचे षडयंत्र हाणून पडण्यासाठी परभणीत रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वात १७ जून रोजी धडक महामोर्चाचे आयोजन केले असून या मोर्चात ५८ जाती समुह सहभागी होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत डॉ अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष भदंत डॉ उपगुप्त महास्थवीर यांनी दिली.

धडक महामोर्चा संयोजन समितीच्या वतीने दि.३ जून रोजी हॉटेल सीटी पॅलेस येथे पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या




पत्रकार परिषदेस डॉ भदंत उपगुप्त महास्थवीर, भदंत बुद्धकीर्ती महाथेरो भदंत सुगत शांत्येय जेष्ठ नेते गौतम मुंडे

चर्मकार महासंघाचे एस डी ठोंबरे आशिष वाकोडे प्रदीप वाहूळे सचिन पाचपुंजे यशवंत मकरंद सुधीर कांबळे दिपक वारकरी सुनील पाचपुंजे सतीश भिसे विश्वजित वाघमारे सह संयोजन समिती पदाधिकारी उपस्थित होते.

मोर्चाच्या तयारी संदर्भात माहिती देताना म्हणाले की, जिल्हाभरातून पन्नास हजार लोक या मोर्चात सहभागी होणार आहेत.आज पर्यंत मानवत जिंतूर पूर्णा गंगाखेड आदी तालुका स्तरीय बैठका घेण्यात आल्या आहेत.

शनिवार बाजार येथून दुपारी १२वाजता महामोर्चा प्रारंभ होणार असून शहरातून तो जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे.या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी असे आवाहन धडक मोर्चा संयोजन समितीच्या वतीने केले आहे.